PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 2

# भारतीय महिला सक्षमीकरणाची वाटचाल

प्रा. सौ. स्नेहल निलेश देशमुख.
अर्थशास्त्र वभाग,
मातोश्री सुमती चं. टिपणीस महा वदयालय,
नेरळ. महाराष्ट्र

## गोषवारा

आधुनिक काळात भारतीय महिलांच्या सक्षमीकरणाचा वचार करतांना प्राचीन भारतीय संस्कृती मधील स्त्रीवादाचा वेध घेणे आवश्यक ठरते. महिला सक्ामीकरणाच्या संदर्भात महिलांचे शक्षण, आरोग्य, निर्णय- प्र क्रयेतील सहभाग अशा अनेक माध्यमातून अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. वेदपूर्व काळ ते आधुनिक काळ या संदर्भात आ र्थक वकासाच्या प्र क्रयेत वास्त वक पाहता श्रमाच्या पातळीवर महिलांचा हिस्सा वाढतच आहे. 'स्त्री सक्षमीकरण' ही संज्ञा उच्चारायला आ ण ऐकायला चांगली वाटते. या सदर्भात अनेक कायदेही आहेत पण प्राचीन काळातील स्त्रीची अत्यंत बिकट अवस्था काही प्रमाणात बदलली आहे का? या संदर्भात या शोधनिबंधातून व वध अंगांनी प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रस्तावनाः

प्राचीन काळातील महिलांचा इतिहास पाहत असताना नाण्याच्या दोन्ही बाजू तपासणे गरजेचे ठरते. 'महिला सक्षमीकरण' संकल्पनेचा उगम मानवजातीच्या इतिहासातील स्त्रीजातीवरील अन्यायातून झाला आहे. स्त्रीवरील अन्याय सनातन आहेत. समाजनियम आ ण तिचे अस्तित्व इ.ना नाकारुन तिला गुलाम बन वले गेले. त्यातूनच गुलामी झुगारुन स्त्रीमुक्तीकडे वाटचाल करावी या भु मकेतून स्त्रीवादी चळवळ उदयाला आली. या परिवर्तनाच्या प्रवासाची धुरा महर्षी कर्वे, न्या. रानडे, टिळक, आगरकर, म.फुले, डॉ. आंबेडकर, शाहूमहाराज, सा वत्रीबाई, रमाबाई अशा दिग्गजांनी यशस्वीपणे पुढे नेली. आधुनिक काळात शक्षणाचा प्रसार व शासनाच्या व वध योजनांद्वारे स्त्रीवादी चळवळीला यश प्राप्त झालेले आहे.

गृहितके: आधुनिक काळामध्ये भारतीय महिला सक्षमीकरण झालेले आहे.

उदिदष्टये: वैदिक काळ ते आधुनिक काळापर्यंत महिला सक्षमीकरणाचा मागोवा घेणे.

महिला सक्षमीकरण:

महिला सक्षमीकरण हा जागतिक स्तरावरील वषय आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी मात्र 19वे शतक उजाडावे लागले. 1789 मधील फ्रेंच राज्यक्रांतीमधून ‘स्त्री-मुक्ती’ वचारांना निश्चित दिशा लाभली. 1790 साली फ्रान्समध्ये ‘ऑ लंप द गुंझ’ या ले खकेने स्त्रियांच्या हक्कांचा जाहीरनामा प्रका शत करुन स्त्रीला स्वतंत्र स्थान मळाले पाहिजे ही मागणी अग्रक्रमाने केली. पुढे नैरोबी येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत ही संकल्पना मांडली गेली. 1975 नंतर मात्र स्त्री वषयक आंदोलनाचे नेतृत्व स्त्रियांकडे आले. सन 2001 हे वर्ष ‘महिला सक्षमीकरणाचे’ वर्ष मानले गेले. हे सर्व बदल आंतरराष्ट्रीय स्तरावरील असले तरीही त्याचे पडसाद भारतातही पडत होते.

आधुनिक काळात दारिद्रय निर्मुलनासारख्या गंभीर समस्येचे निराकरण करताना जवळजवळ 50**%** लोकसंख्या असणा-या महिलांचे समावेशन करुन सक्षमीकरणास हातभार लावावा असा वचार-प्रवाह पुढे आला. वकासाचे मापदंड लावल्यास ‘फोठे आहे भारतीय स्त्रीचे स्थान**?**” असा प्रश्न पडतो. धर्म**,** जात**,** वर्ग इ.ना वगळून केवळ लंगभेद एवढाच एक फरक स्त्री-पुरुषांमध्ये आहे. स्त्री-पुरुष ही समाजरचनेची समान अंगे आहेत. त्यांना समान संधी ही अपेक्षा ठेवणे साहजिकच आहे. हे पाश्चिमात्य देशात साध्य झालेले असले तरीही हे चत्र भारतीय समाजात आढळत नाही. पाश्चिमात्य देशात स्त्रियांना मतदानाच्या हक्कांसाठी झगडावे लागेल. भारतात हा हक्क राजकीय स्वार्थासाठी का होईना स्त्रियांना सहज बहाल केला गेला. असे असले तरीही दुय्यम दर्जा व शोषण इ.घटक स्त्री वकासातील प्रमुख अडसर आहेत. याची कंमत मात्र कुटुंब**,** समाज व पर्यायाने संपूर्ण अर्थव्यवस्थेला दयावी लागते. वकासाच्या प्र क्रयेत स्त्री-पुरुष समानता पाहिजे.

महिला सक्षमीकरण म्हणजे स्वयंनिर्भरता होय. स्त्री ची ‘स्व‘शक्ती वाढ वणे होय. स्त्री सक्षमीकरण ही दुहेरी व दीर्घकालीन प्र क्रया आहे की ज्यात तुम्ही सक्षम व्हा व त्यासोबत इतरांनाही सक्षम करा.

सक्षमीकरणाची प्र क्रया:

प्राचीन काळ:

वेदपूर्व काळ हा सत्रयांना अनुकूल समजला जातो. या काळातील स्त्रिया अनेक क्षेत्रात आपले कौशल्य सध्द् करु शकत होत्या. ब्रम्हचर्य अवस्थेत स्त्रियांना शक्षण मळत असे. अथर्ववेदाच्या 11-5-18 या ऋचेत ‘ब्रम्हचर्य व वेदअध्ययन स्त्रियांना करता येत असे” असे स्पष्ट म्हटले आहे.

इ.स.पूर्व काळात कौटिल्यानेही त्याच्या लेखनात पुन र्ववाहास मान्यता दिलेली दिसून येते. परंतु इ.स.च्या दुस-या शतकापासून समाजात वधवा ववाहास वरोध होऊ लागला व त्याचे परिणाम स्त्रियांना भोगावे लागले. इ.स.500 नंतर तर केशचवपन करुन स्त्रियांना वद्रुप करण्याची प्रथा सुरु झाली. मनु व याज्ञवल्क्य यांनी केशवपना वषयी कोठेही उल्लेख केलेला नाही. तरीही 12व्या शतकानंतर या पध्दतीला वशेष स्थान प्राप्त झाले. म्हणजेच इ.स.पूर्व 500 नंतरच्या पुराणकाळात स्त्रियांचा दर्जा घसरण्यास सुरुवात झाली.

परंतु त्यापूर्वी शक्षण, व्यवसाय, वद्वत्ता वक्तृत्व इ. अनेक क्षेत्रात स्त्रिया कौशल्य प्राप्त करीत होत्या. यावरुन असे म्हणता येईल की, भारतीय स्त्रियांचा आदर्श आजच्या सक्षमीकरणाच्या भू मकेला आदर्श ठरणारा आहे. कारण स्त्री सक्षमीकरणाच्या भू मकेची जी मूल्ये आज प्रतिपादन केली जातात ती तत्कालीन स्त्रीच्या कर्तृत्वात पहावयास मळतात.

पुराणातील दैदिप्यमान कर्तृत्व गाजवणा-या कुंती, द्रौपदी, गार्गी, मैत्रेयी इ. स्त्रियांनी स्त्री सक्षमीकरणाचा प्रारंभ त्या काळात केलेला दिसतो.

<u>आधुनिक काळः</u>

समाजात पुरुषांच्या सोयीसाठी सुरु झालेल्या काही क्रूर प्रथांनी स्त्रियांच्या जीवनातील नरकयातना सुरु झाल्या. ‘सर्व्हियामधील सुंदर स्त्रिया बुटाच्या कंमतीला वकल्या जात’ याचे दाखले युरो पयन इतिहासात मळतात. तसेच भारतात मोगलकाळात स्त्रियांना कैदी करुन भ्रष्ट करुन आपल्या जनानखान्यात ठेवल्याचे दाखले इतिहासात आहेत.

याच पार्श्वभूमीवर मात्र छत्रपती शवाजी महाराजांच्या काळात स्वराज्यातील कंवा शत्रूकडील स्त्रियांनादेखील सन्मान दिला जात असे. छत्रपती शवाजी महाराज स्त्रीवादी वचारसरणीचे होते. यानंतर 19वे शतक सामाजिक परिवर्तनाचे शतक मानले जाते. 20व्या शतकात घडून आलेल्या परिवर्तनाने पूर्णत्वाचा टप्पा गाठला. दीर्घकालीन अंधःकारमय स्त्रीजीवनात एका नव्या आशावादी पर्वाची सुरुवात झालेली दिसते.

स्वातंत्र्यप्राप्ती, लोकशाहीचा स्वीकार, सामाजिक परिवर्तन इ.मुळे भारतीय स्त्रियांचे सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक अस्तित्व अर्थपूर्ण बदलले. ‘स्त्री’च्या पारंपारिक

जीवनमानात बदल घडवून आणण्यासाठी 'शक्षण' हा एक मैलाचा दगड बनू शकतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्य-घटनेत कलम 14, **15, 16, 39**अ, **39**क, **42** या घटनात्मक तरतूदींच्या सहाय्याने महिला सक्षमीकाणासाठी वशेष प्रयत्न झाले आहेत. 2005-06 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री पी. चदंबरम यांनी लंगभेदावरील अर्थसंकल्प **(Gender Budget)** सादर करुन महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले. अशाप्रकारे महिला सक्षमीकरणाचा प्रवाह आंतरराष्ट्रीय स्तरावरुन भारतातदेखील आलेला दिसून येतो.

परंतु वैदिक वा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत महिलांच्या समग्र जीवनात आमूलाग्र बदल झालेले असले तरीही अजून सक्षमीकरणाचा मोठा पल्ला गाठावयाचा आहे. महिलांचा रोजगार, आरोग्य, नेतृत्वगुण इ.बाबत जर स्त्री-पुरुष तुलना केली तर असंतुलन दिसून येते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार -

1) जगातील 67% उत्पन्न महिलांच्या श्रमातून तयार होते त्यापैकी 10%उत्पन्नावरच महिलांची मालकी असते.
2) जागतिक संपत्तीपैकी 1%संपत्तीच महिलांच्या मालकीची आहे.
3) महिला या जगातील अ शक्षीत लोकसंख्येच्या 2/3 हिस्सा व्यापतात.
4) शक्षणाच्या प्रसारामुळे महिलांच्या आरोग्याबाबत जागृती वाढत आहे.

पण राजकीय नेतृत्वाबाबतची आकडेवारी अंतर्मुख करणारी आहे. भारतात 51.6% पुरुष लोकसंख्या व 48.4% महिला लोकसंख्येत 87.8% पुरुष संसदेचे सभासद असून फक्त 12.2% महिला संसदेच्या सभासद आहेत. तसेच 87% पुरुष मुख्यमंत्री असून 13% महिला या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचल्या आहेत. 2011 च्या राष्ट्रीय सर्व्हेनुसार ग्रामीण व शहरी भागातील एकूण 25.51% महिला या संघटीत क्षेत्रात कार्यरत आहेत.

यावरुन स्त्रियांचे श्रम, आरोग्य, शक्षण, बँकींग, सेवाक्षेत्र इ.बाबत रोजगाराच्या स्थितीबाबत बदल घडत आहेत.

<u>सारांशः</u>

अतिप्राचीन काळ ते आधुनिक काळापर्यंत स्त्री जीवनमान पाहिल्यास असे दिसते की, मध्ययुगीन काळापर्यंत स्त्रियांची दैन्यावस्थाच होती. शवाजी महाराजांच्या काळापासून स्त्रियांना कुटुंबात, समाजात मानसन्मान मळू लागला. छत्रपती शवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वावर मातोश्री जिजाऊ यांचा निश्चितच प्रभाव होता. त्यांनी स्वतः कायम स्त्रियांचा

आदर केला आ ण प्रजेसमोर याबाबत एक आदर्श घालून दिला. त्यानंतर ब्रिटिश राजवटीमुळे तत्कालीन भारतीय तरुणांवर आधुनिकतेचा प्रभाव पडला. 'स्त्री शक्षण - सक्षमीकरण' यास सुरुवात झाली. अजूनही पूर्णपणे स्त्री सक्षमीकरण झालेले आहे असे म्हणता येणार नाही. तरीही प्राचीन काळाशी तुलना करता आधुनिक काळात समाजात स्त्रीचे स्थान आ र्थक, सामाजिक, राजकीय आ ण कौटुंबिक क्षेत्रात पूर्णपणे बदललेले दिसते. म्हणजेच सक्षमीकरणाचा मोठा पल्ला गाठलेला दिसून येतो.

## संदर्भग्रंथः

1. National Sample Survey, 68th round, July2011-June2012.
2. Dr. Varma P.S., 'Empowering women to Negotiate for change', Bhaskar Publication, 9th Edition2010.
3. Suman Pamecha and Ankita Khatik, 'Empowerment of Rural Women, Social Action,' Vol-55 Oct-Dec 2005.
4. मराठे सुनिती, 'स्त्रियांचे सबलीकरण व प्रचलीत शक्षणव्यवस्था,' प्रबोधन प्रकाशन, ऑक्टो-नोव्हें.2003.
5. सामंत मेधा, 'मायक्रोफायनान्स व महिला सक्षमीकरण व कष्टकरी महिला एक सहप्रवास' पुणे रिसर्च सेंटर, पुणे 2009.
6. जे.भाग्यलक्ष्मी, 'महिला सक्षमीकरणः एक लांब पल्ला', योजना, ऑगस्ट 2004.
7. आर.एस्. साळुंखे, जी.बी.गावंडे, 'भारतातील महिला साक्षरता आ ण सक्षमीकरण', योजना, जून 2006.
8. डॉ. सदा शव सरकटे, '1980 नंतरची स्त्रीवादी क वता' चन्मय प्रकाशन, औरंगाबाद 2011
9. प्रा. डॉ. मोरे दिनेश, ' शवरायांचा स्त्री वषयक दृष्टीकोन', पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद 2012